सकाळ ॲग्रोवन ६
नांदेड, मंगळवार, २९ ऑक्टोबर २०२४

# कृषी अभियांत्रिकीकरण प्रशिक्षणास प्रतिसाद

## कृषी विज्ञान केंद्र पोखर्णी येथे तीन दिवसीय कौशल्य विकास कार्यक्रम

ॲग्रोवन वृत्तसेवा

नांदेड : वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी व सीएनएच इंडस्ट्रियल इंडिया (न्यू हॉलंड) नवी दिल्ली यांच्या व्यावसायिक, सामाजिक जबाबदारीच्या माध्यमातून शेतकरी व ग्रामीण युवकांकरिता कौशल्य विकास-कृषी यांत्रिकीकरण या विषयावर कृषी विज्ञान केंद्र पोखर्णी येथे तीन दिवसीय कृषी अभियांत्रिकीकरण कौशल्य विकास प्रशिक्षण ता. २२ ते २४ ऑक्टोबर दरम्यान झाले. यास प्रशिक्षण कार्यक्रमास चांगला प्रतिसाद मिळाला.

यावेळी कृषी विज्ञान केंद्राचे संचालक डॉ. एस. डी. मोरे, वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ देविकांत देशमुख, विषय विशेषज्ञ, कर्मचारी उपस्थित होते. दिवसेंदिवस शेतीमध्ये वाढणारा खर्च, लागणारा वेळ आणि कष्ट तसेच कामगार वर्गाची कमतरता या समस्या शेतकऱ्याला भेडसावत आहेत. अशा विविध समस्यांमुळे शेतकऱ्यांमध्ये नैराश्य निर्माण होऊ नये याकरिता त्यांच्या खर्चात, वेळेत आणि कष्टात बचत व्हावी त्यासाठी कृषी विद्यापीठ आणि संशोधन संस्था यांच्या एकत्रित संशोधनातून शेतिकामासाठी निर्माण करण्यात आलेल्या सुधारित तंत्रज्ञानाचा आणि यंत्रांचा वापर करून शेतकऱ्यांना शेती करण्यास सुलभ होईल असे डॉ. देविकांत देशमुख यांनी सांगितले.

विषय विशेषज्ञ प्रा.एम.जी. कल्याणकर, डॉ. एम. एन. अंबोरे, प्रा.अल्का पवळे पाटील, प्रा. आर. आर. इंगोले यांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षणाच्या दुसऱ्या दिवशी शेतकऱ्यांना सादरीकरणातून आणि यंत्रांच्या प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करण्यात आले होते. यावेळी डॉ. उदय खोडके, शिक्षण विस्तार संचालक डॉ. भगवान आसेवार, कृषी यंत्रे व शक्ती विभाग प्रमुख डॉ. स्मिता सोलंकी यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे शेतकऱ्यांना फवारणी, ड्रोन प्रशिक्षण महिला उद्योग-व्यवसायासाठी यंत्रे तसेच पिकांच्या आंतरमशागत आणि काढणी पश्चात वापरण्यात येणारी यंत्रे, सौर ऊर्जेवर चालणारी यंत्र तसेच ट्रॅक्टर चलीत व बैलाच्या मदतीने वापरण्यात येणारी कृषी अवजारे व यंत्रे याबद्दल माहिती दिली. यानंतर शेतकऱ्यांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.